**<u>प्रे स नो ट</u>** **दिनांक : ०३/०४/२०२४**

**<u>भारतीय नौदलाचे अॅन्टी पायरेसी ऑपरेशन दरम्यान ताब्यात घेतलेले ०९ सोमालियन चाच्यांना अटक केलेबाबत.....</u>**

आज दिनांक ३/०४/२०२४ रोजी भारतीय नौदलाचे आय.एन.एस. त्रिशुल या युध्दनौकेचे रेग्युलेटिंग ऑफिसर लेफ्टनंट श्री. अकितकुमार अवाल यांनी लेखी तक्रार देवुन कळविले की, भारतीय नौदलाकडून समुद्रातून चालणारे व्यापारी जहाज व क्रू मेंबर्स यांची सुरक्षितते कामी नियमित गस्त करण्यात येत असते. दिनांक दि. २८/३/२४ रोजी २२.५९ वाजता आय.एन.एस. त्रिशुल व नेव्हल शिप सुभेदा यांना हाय अलर्ट मिळाला कि, इरानियन प्लॅग असलेले शिप नामे ए आय कम्बर या मासेमारी करणारे जहाजास हायजॅक केले आहे. आय.एन.एस. त्रिशुल व नेव्हल शिप सुभेदा यांना खात्री झाली की सदरची मासेमारी करणारे जहाज हे पायरेट यांनी हायजॅक केले आहे.

आय.एन.एस. त्रिशुल व नेव्हल शिप सुभेदा या इंडियन युध्द नौका यांनी दिनांक २९/३/२४ रोजी ०३.१० वाजता खात्री केली की, सदरचे ठिकाण हे १०५ नॉटिकल मैल सोमालियाचे कोस्ट हददीत आहे. इंडियन युध्द नौकेवरील अधिकारी यांनी त्यांना वारंवार अनाउन्समेंट करून सांगितले की, तुम्ही जहाज थांबवा आणि ओलिस ठेवलेल्या इसमांना मुक्त करा अन्यथा आम्हाला तुमच्या विरूध्द कारवाई करावी लागेल परंतु पायरेट काहीही ऐकुण न घेता जहाज थांबवत नव्हते किंवा सरेंडर करीत नव्हते. म्हणुन आय एन एस सुमेधा हि युध्द नौका जवळ जावुन १६ नंम्बर चॅनल मेरिटाईम मोबाईल ब्रॉडकास्ट मार्फत त्यांना वॉरनिंग करीत होती परंतु पायरेट त्याकडे दुलक्ष करीत होते.

त्यानंतर वारंवार दिलेल्या वॉरनिंग नंतर सोमालियन पायरेट यांनी ओलीस ठेवलेल्या क्रु मेंम्बरना ढाल बनवुन मासेमारीच्या डेकवर येवुन सरेंडर करीत आहे असा संदेश दिला त्यानंतर त्यांनी त्यांच्याकडे असलेले अवैध्य अग्नीशस्त्रे पाण्यात टाकुन नाश केली त्यानंतर इंडियन युध्द नौकेवरील कमांडो हे ओलीस ठेवलेल्या मासेमारी जहाजावर उतरले आणि खात्री केली असता त्यामध्ये एकुण ९ सोमालियन चाच्या पायरेट होते तसेच ओलीस ठेवलेल्या मासेमारी जहाजावरील एकुण २३ क्रु मेंम्बर हे पाकिस्तानी नागरिक होते.

इंडियन युध्द नौकेवरील कमांडो यांनी क्रु मेंम्बरकडे चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, सोमालियन चाच्या पायरेट यांच्याकडे एके ४७ रायफल हॅन्डग्रेनेड व रॉकेट लॉन्चर होते आणि ते जबरदस्तीने त्यांच्या मासेमारी जहाजावर चढले आणि त्यांनी शस्त्राचा धाक दाखवुन जर काही हलचाल केल्यास मारून टाकु अशी धमकी देत होते. त्यावेळी इंडियन कमांडो यांनी सदर मासेमारी जहाजाची पाहणी केली असता त्या जहाजावर एकुण ७२८ जिवंत काडतुसे एके ४७ रायफलची तसेच एक जीपीएस डिव्हाईस, ०८ मोबाईल फोन इत्यादी साहित्य जप्त करून ताब्यात घेतले.

सोमालियन चाच्यांनी ताब्यात घेतलेली इरानियन देशाचा प्लॅग असलेली मासेमारी बोट व त्यावरील २३ क्रु मेंम्बर यांचेकडे चौकशी करून त्यांना सोडुन दिले आणि एकुण ९ सोमालियन चाच्या पायरेट यांना कायदेशिर कारवाई करण्यासाठी आज दिनांक ०३/०४/२०२४ रोजी सकाळी १२.३० वाजता यलोगेट पोलीसांच्या ताब्यात दिले आणि तशी वरील प्रमाणे लेखी तक्रार दिल्याने यलोगेट पोलीस ठाणेत गु.र.क्र. २०/२०२४, कलम ३६४(अ), ३६३, ३५३, ३४१, ३४२, ३४४,(अे) १२०(ब), १४३, १४५, १४७,१४८,१४९, ५०६(२), ३४ भादवि सह मेरिटाईम अन्टी पायरसी अॅक्ट २०२२ कलम ३,५ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५,२७ सह पासपोर्ट अधिनियम कलम ३,६ सह परकीय नागरी कायदा कलम १४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

भारतीय नौदलाचे युध्द नौका आय.एन.एस.त्रिशुल आणि सुमेधा यांनी अॅटी पायरेसी ऑपरेशन दरम्यान ताब्यात घेतलेले एकुण ०९ सोमालियन समुद्री चाचे यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीतांना उदईक दिनांक ४/०४/२०२४ रोजी मा. न्यायालया समक्ष हजर करीत आहोत. तसेच सदर सोमालियन चाचे यांनी गुन्हयात वापरलेले ०९ मोबाईल फोन, ७२८ जिवंत काडतुसे एके ४७ रायफलची , इत्यादी साहित्य जप्त करण्यात आले आहेत.

सदर कारवाई ही मा. पोलीस सह आयुक्त (का व सु), बृहन्मुंबई, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मा. पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पोलीस अधिकारी व तपास पथक यांनी केली आहे.